## MAHARASHTRA ACT No. XXVIII OF 1993.

## MAHARASHTRA GROUNDWATER (REGULATION FOR DRINKING WATER PURPOSES) ACT, 1993.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक १० ऑगस्ट १९९३ रोजी मिळाली असल्यामुळे, तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

डी. एन. चौधरी,
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXVIII OF 1993.

## AN ACT TO REGULATE THE EXPLOITATION OF GROUNDWATER FOR THE PROTECTION OF PUBLIC DRINKING WATER SOURCES AND MATTERS CONNECTED THEREWITH AND INCIDENTAL THERETO.

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १६ ऑगस्ट १९९३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

## सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.

**सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे जतन करणे व त्याच्याशी संबंधित आणि तदनुषंगिक बाबी यांसाठी, भूजलाच्या समुपयोजनाचे विनियमन करण्याकरिता अधिनियम.**

ज्याअर्थी, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे जतन करण्यासाठी भूजलाच्या समुपयोजनाचे विनियमन करणे व त्याच्याशी संबंधित व तदनुषंगिक बाबींची तरतूद करणे इष्ट आहे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चव्वेचाळिसाव्या वर्षी, याद्वारें पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी विनियमन) अधिनियम, १९९३ असे म्हणता येईल.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) तो, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास व राज्यातील अशा स्थानिक क्षेत्रात अंमलात येईल; व निरनिराळ्या स्थानिक क्षेत्रांसाठी निरनिराळे दिनांक नेमून देता येतील.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) "त्या त्या वेळी अंमलात असलेला अन्य कोणताही कायदा" म्हणजे भारताच्या संविधानाच्या अनुसूची सातमधील सूची दोन—राज्य सूची यात नमूद केलेल्या कोणत्याही नोंदीखाली अधिनियमित केलेला व त्या त्या वेळी अंमलात असलेला कायदा;

(२) "समुचित प्राधिकारी" म्हणजे जिल्हाधिकारी व यात, राज्य शासन, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा उप जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो आणि राज्याच्या वेगवेगळ्या स्थानिक क्षेत्रांसाठी वेगवेगळे अधिकारी नेमून देता येतील ;

(३) पाण्याच्या उपयोगासंबंधात, "पिण्याच्या पाण्याचे प्रयोजन" म्हणजे, लोकांनी पिण्यासाठी व इतर घरगुती प्रयोजनांसाठी केलेला पाण्याचा वापर किंवा उपयोग व यामध्ये गुरांसाठी अशाच संबद्ध प्रयोजनांकरिता केलेल्या पाण्याच्या वापराचा समावेश होतो ; १९६६ चा ७. ४१.

**स्पष्टीकरण.**—या खंडांच्या प्रयोजनासाठी "घरगुती प्रयोजने" या शब्दप्रयोगात स्वयंपाक, स्नान, धुणे, सफाई यांसाठी आणि इतर दैनंदिन कामांसाठी केलेल्या पाण्याच्या वापराचा किंवा उपयोगाचा समावेश असेल ;

(४) "भूजल" म्हणजे, कोणत्याही विशिष्ट ठिकाणी, जमिनीच्या पृष्ठाखालील एखाद्या जलप्रस्तरामध्ये असलेले पाणी—मग ते ज्याठिकाणी स्थिर असेल किंवा वाहत्या स्थितीत असेल त्या ठिकाणाची भूशास्त्रीय रचना कशीही असो आणि त्यामध्ये भूजलाच्या सर्व साठ्यांचा समावेश होतो ;

(५) "अति समुपयोजित पाणलोट क्षेत्र" म्हणजे, जेथे भूजल काढून घेण्याचे अंदाजित वार्षिक प्रमाण हे, विहित रीतीने गणना केलेल्या अंदाजित सरासरी वार्षिक भूजल पुनर्भरणाच्या ८५ टक्क्यांहून अधिक असेल व कलम ६ अन्वये ते तसे घोषित करण्यात आले असेल असे पाणलोट क्षेत्र ;

(६) "विहित" म्हणजे, नियमांद्वारे विहित ;

(७) "सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचे स्रोत" म्हणजे, ज्यातून राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण किंवा राज्य शासन, राजपत्रातील, अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील असे अन्य प्राधिकरण, लोकांना पाण्याचा पुरवठा करीत असेल अशी विहीर व यामध्ये जिल्हाधिकारी अधिसूचित करील अशा बंधाऱ्याचा किंवा पिण्याच्या पाण्याच्या इतर कोणत्याही स्रोताचा समावेश होतो ;

(८) "सार्वजनिक पाणीपुरवठा यंत्रणा" म्हणजे, ज्याद्वारे पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी पाण्याचा पुरवठा करण्यात येतो अशी सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोताशी संबंधित असलेली बांधकामे व यात जलवाहिन्या, साठवण जलाशय, नळखांब, टाक्या, हातपंप, विजेवर चालणारे पंप व त्याच्याशी संबंधित इतर सर्व सामग्री यांचा समावेश होतो;

(९). "नियम" म्हणजे, या अधिनियमाखाली केलेले नियम ;

(१०) एखाद्या विहिरीच्या संबंधात, "खोदणे" या शब्दामध्ये सर्व व्याकरणिक फेरफारांसह व सजातीय शब्दप्रयोगांसह त्या शब्दामध्ये एखाद्या नवीन विहिरीचे वेधन, विंधण किंवा खोदकाम किंवा अस्तित्वात असलेल्या विहिरीची खोली वाढविणे याचा समावेश होतो ;

(११) "तंत्र अधिकारी" म्हणजे सहायक भूशास्त्रज्ञाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा भूजल सर्वेक्षण व विकास अभिकरणाच्या कार्यालयातील भूशास्त्रज्ञ ;

(१२) "पाणी टंचाई क्षेत्र" म्हणजे जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी कलम ४ अन्वये असे क्षेत्र म्हणून घोषित केलेले क्षेत्र;

(१३) "पाणलोट क्षेत्र" म्हणजे, या अधिनियमाची प्रयोजने विचारात घेऊन भूजल सर्वेक्षण व विकास अभिकरणाने, वेळोवेळी निश्चित केलेले व अधिसूचित केलेले, स्थलाकृती जलविभाजक रेषेच्या आतील परिसिद्ध क्षेत्र ;

(१४) "विहीर" म्हणजे, भूजलाचा शोध घेण्यासाठी किंवा ते काढण्यासाठी खोदलेली विहीर आणि यामध्ये खोदलेली विहीर, विंधण विहीर, खोदलेली-नि-विंधण विहीर, नलिका विहीर व निस्यंदन विहीर यांचा समावेश होतो.

## प्रकरण दोन

### सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या साठ्याचे जतन करण्यासाठी उपाययोजना

१९६६ चा महा. ४१. ३. (१) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला विवक्षित इतर कोणताही कायदा यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आणि सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या क्षेत्रांमध्ये स्रोतामधून पिण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक प्रमाणात पाणी उपलब्ध होण्याच्या संबंधातील विहिरींचे सर्वसाधारण जनतेचे हितसंबंध लक्षात घेऊन कोणतीही व्यक्ती सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या बांधकाम स्रोताच्या परिसरात अशा स्रोतामधून पाचशे मीटर अंतराच्या आत कोणत्याही प्रायोजना- करण्यास साठी कोणतीही विहीर, जर असा स्रोत व विहीर ही दोन्ही एकाच पाणलोट क्षेत्रात असतील तर, मनाई. खोदणार नाही :

परंतु असे की, पोट-कलम (१) च्या तरतुदी, राज्य शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या वतीने, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचा साठा म्हणून वापरण्यासाठी विहीर खोदण्याच्या बाबतीत लागू होणार नाहीत :

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, कोणत्याही व्यक्तीला, सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतापासून पाचशे मीटर अंतराच्या आत सिंचनाच्या किंवा पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी विहीर खोदायची असेल तर, समुचित प्राधिकाऱ्याची अनुमती घेतल्या नंतरच केवळ ती तसे करील.

(३) पोट-कलम (२) अन्वये परवानगीसाठी करावयाचा अर्ज, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा शुल्कासह समुचित प्राधिकाऱ्याकडे करण्यात येईल.

(४) समुचित प्राधिकाऱ्याला, पोट-कलम (३) अन्वयेचा अर्ज मिळाल्यावर, तंत्र अधिकाऱ्याचा सल्ला घेतल्यानंतर, अशा खोदकामाचा सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या साठ्यावर विपरीत परिणाम होणार नाही अशी त्याची खात्री पटली तर, सिंचनाच्या किंवा पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी विहीर खोदण्यास परवानगी देऊ शकेल किंवा अशी परवानगी दिल्यामुळे अशा स्रोतावर विपरीत

परिणाम होणार असेल तर मागितलेली परवानगी नाकारू शकेल व त्याची कारणे लेखी नमूद करावी लागतील :

परंतु असे की, समुचित प्राधिकाऱ्याने अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून एकशेवीस दिवसांच्या आत त्याचा निर्णय अर्जदाराला कळविला नाही तर मागितलेली परवानगी देण्यात आली असल्याचे मानण्यात येईल, परंतु अशी मानीव परवानगी नेहमी नियमांमध्ये विहित केलेल्या कोणत्याही शर्तीच्या अधीन असेल.

(५) या कलमाखाली देण्यात येणारी प्रत्येक परवानगी—

(अ) समुचित प्राधिकारी, त्याच्या मते सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक असेल तर, वेळोवेळी, आदेशाद्वारे, अशा विहिरीतून पाणी काढण्यास मनाई करू शकेल पाणी काढण्यावर निर्बंध घालू शकेल किंवा ते काढण्याच्या बाबतीत विनियमन करू शकेल व त्याची कारणे लेखी नमूद करावी लागतील या शर्तींच्या ;

(ब) विहित करण्यात येतील अशा इतर शर्तींच्या व निर्बंधांच्या,

अधीन असेल.

१९९६ चा महाराष्ट्र ४१.

पाणी टंचाई क्षेत्र घोषित करणे.

४. पावसाळ्यामध्ये किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, पावसाचे प्रमाण व स्वरूप आणि इतर संबंधित घटक लक्षात घेता, जिल्ह्याच्या कोणत्याही क्षेत्रातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांवर विपरीत परिणाम होण्याचा संभव आहे असे जिल्हाधिकाऱ्याचे मत झाले तर, त्याला तंत्र अधिकाऱ्याच्या सल्ल्यानुसार, आदेशाद्वारे, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा परंतु एकावेळी एक वर्षापेक्षा अधिक नसेल एवढ्या कालावधीसाठी असे क्षेत्र पाणीटंचाई क्षेत्र असल्याचे घोषित करता येईल.

पाणीटंचाई क्षेत्रातील विहिरींमधून पाणी काढण्याचे विनियमन करणे.

५. (१) कलम ४ अन्वये कोणतेही क्षेत्र पाणीटंचाई क्षेत्र असल्याचे घोषित करण्यात आल्यानंतर, समुचित प्राधिकाऱ्याला, पाणीटंचाईच्या कालावधीसाठी, आदेशाद्वारे, अशी विहीर सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतापासून एक किलोमीटर अंतराच्या आत असेल त्या बाबतीत पाणी पिण्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी पाणी काढण्यावर निर्बंध घालून किंवा असे पाणी काढण्यास मनाई करून, अशा क्षेत्रातील कोणत्याही विहिरीतून पाणी काढण्याचे विनियमन करता येईल :

परंतु या कलमान्वये असे विनियमन करण्याचा प्रयोजनार्थ,—

(अ) सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतापासून एक किलोमीटरपर्यंतचे क्षेत्र, तंत्र अधिकारी सल्ला देईल त्यानुसार झोनांमध्ये विभागण्यात येईल आणि खंड (ब) व (क) मध्ये निर्देश केलेले प्राथम्यक्रम हे, परिस्थिती व ठिकाण यांच्या निकडीनुसार अगदी जवळच्या झोनपासून सर्वात लांबच्या झोनपर्यंत संबंधित असतील ;

(ब) ज्या विहिरीचे पाणी उभ्या पिकांसाठी वापरले जात असेल अशी विहीर नसणारी आणि सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताच्या अधिक जवळ असलेली विहीर म्हणजे पहिला प्राथम्यक्रम मानण्यात येईल ;

(क) ज्या विहिरीचे पाणी उभ्या पिकासाठी वापरण्यात येत असेल अशा विहिरीला व्यवहार्य असेल तेथवर सर्वात अखेरचा प्राथम्यक्रम देण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये असा निर्बंध लादणारा किंवा मनाई करणारा आदेश, विहिरीच्या मालकाकडे, निर्बंधाची किंवा, यथास्थिति, प्रतिबंधांची अंमलबजावणी सुरू होण्याच्या किमान पंधरा दिवस अगोदर पाठवून किंवा देऊन तो व्यक्तिश: त्याच्यावर बजावण्यात येईल किंवा बजावण्याची व्यवस्था करण्यात येईल. जेव्हा मालक स्वत: भेटणार नाही तेव्हा, नोटिशीची अधिकृत प्रत त्याच्या कुटुंबातील कोणत्याही प्रौढ व्यक्तीला देण्यात येईल.

एखाद्या महामंडळाच्या किंवा व्यवसाय संस्थेच्या संबंधातील आदेश असेल तेव्हा, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ याच्या पहिल्या अनुसूचीतील, आदेश एकोणतीसचा नियम २ किंवा, यथास्थिति, आदेश तीसचा नियम ३ मधील समन्स बजावण्यासाठी असलेल्या पद्धतीनेच तो आदेश बजावण्यात येईल.

६. समुचित प्राधिकाऱ्याला तंत्र अधिकाऱ्याच्या सल्ल्याने एखादे पाणलोट क्षेत्र हे, अति-समुपयोजित पाणलोट क्षेत्र म्हणून घोषित करता येईल. पाणलोट क्षेत्र घोषित करणे.

१९६६ चा महाराष्ट्र ४१. ७. (१) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ यात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी आणि मनुष्यप्राण्यांची पिण्यासाठी पाण्याचा वापर करण्याची मूलभूत गरज लक्षात घेऊन आणि अति-समुपयोजित पाणलोट क्षेत्रातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतामधून पिण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक प्रमाणात पाणी उपलब्ध होण्याच्या संबंधातील सर्वसाधारण जनतेचे हितसंबंध लक्षात घेऊन, कोणतीही व्यक्ती, समुचित प्राधिकाऱ्याच्या परवानगीवाचून, अति-समुपयोजित पाणलोट क्षेत्रामध्ये विहीर खणणार नाही : पाणलोट क्षेत्रात विहिरी खणण्यास मनाई.

परंतु, पोट-कलम (१) च्या तरतूदी सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचा स्रोत म्हणून वापर करण्याकरिता राज्य शासनाच्या वतीने किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या वतीने विहीर खोदण्याच्या बाबतीत लागू होणार नाहीत.

(२) पोट-कलम (१) खालील परवानगीकरिता, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात तेवढ्या फीसोबत समुचित प्राधिकाऱ्याकडे अर्ज करण्यात येईल.

(३) या कलमान्वये देण्यात येणारी परवानगी ही पुढील शर्तींच्या अधीन राहून देण्यात येईल :—

(अ) समुचित प्राधिकाऱ्यास जनतेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक वाटल्यास, तो प्राधिकारी आदेश काढून त्याद्वारे, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा विहिरीतून व तेवढ्या कालावधीकरिता पाणी काढण्यास मनाई करू शकेल, त्यावर निर्बंध घालू शकेल किंवा त्याचे विनियमन करू शकेल व तो त्याची कारणे लेखी नमूद करील;

(ब) विहित करण्यात येतील अशा अन्य शर्ती व निर्बंध.

८. अति-समुपयोजित पाणलोट क्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या कोणत्याही विहिरींमुळे कोणत्याही सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे तंत्र अधिकाऱ्याच्या सल्ल्यावरून आढळून आले तर समुचित प्राधिकारी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी आणि पावसाचे ठरीव प्रमाण व स्वरूप आणि अन्य कोणतीही संबंधित बाब विचारात घेऊन त्या विहिरीच्या मालकाला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आदेशाद्वारे, दरवर्षी, १ फेब्रुवारी पासून ३१ जुलै पर्यंतच्या ६ महिन्यांच्या कालावधीत अशा विहिरीतून पाणी काढण्यास मनाई करू शकेल. अस्तित्वात असलेल्या विहिरीतून विवक्षित कालावधीकरिता पाणी काढण्यास मनाई.

९. या अधिनियमात आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी समुचित प्राधिकारी, अति-समुपयोजित पाणलोट क्षेत्रांतील अस्तित्वात असलेल्या कोणत्याही विहिरींमुळे कोणत्याही सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतावर प्रतिकूल परिणाम होत आहे असा सल्ला तंत्र अधिकाऱ्याने दिल्यास आणि कलम ८ खालील कार्यवाहीद्वारे अशा स्रोताचे पुरेशा प्रमाणात जतन करणे शक्य नसल्यास, त्या विहिरीच्या मालकाला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, अशा विहिरींमुळे होणाऱ्या प्रतिकूल परिणामाची व्याप्ती विचारात घेऊन, आदेशाद्वारे त्या मालकाला अशा विहिरीतून पाणी काढण्याचे बंद करण्यास आणि ती तात्पुरती किंवा कायमची बंद किंवा सीलबंद करण्यास भाग पाडू शकेल. अस्तित्वात असलेली विहीर बंद करणे.

माहिती मिळवण्या-साठी कोणत्याही जमिनीवर प्रवेश करण्याचा अधिकार.

१०. सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोताचे जतन करण्यासाठी किंवा सार्वजनिक पाणी-पुरवठा यंत्रणेच्या देखभालीसाठी जेव्हा चौकशी किंवा तपासणी करणे आवश्यक असेल तेव्हा समुचित प्राधिकारी किंवा त्याने या संदर्भात यथोचित रीत्या प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी, कोणत्याही जमिनीच्या मालकास किंवा भोगवटादारास पूर्वसूचना दिल्यानंतर,—

(अ) उक्त प्रयोजनासाठी त्यास आवश्यक वाटेल अशा जमिनीवर प्रवेश करील;

(ब) त्या जमिनीचे सर्वेक्षण करील किंवा पातळ्या घेईल;

(क) पंपाच्या चाचण्या घेईल व भूभौतिक सर्वेक्षणे करील;

(ड) पाण्याची पातळी नमूद करणारी यंत्रे व जलमापन यंत्रे विहिरीवर बसवील व त्यांची देखभाल करील ; आणि

(इ) अशी चौकशी व तपासणी करण्याकरता आवश्यक असतील अशा इतर सर्व गोष्टी करील.

कलम ३, ५, ७, ८ किंवा ९ याच्या तरतुदींचे उल्लंघन थांबविण्याचा अधिकार.

११. (१) कलम ३ किंवा ७ च्या तरतुदींचे उल्लंघन करून कोणतीही विहीर खोदण्यात आली आहे किंवा खोदण्यात येत आहे किंवा कलम ५, ८ वा ९ चे उल्लंघन करून पाणी काढण्यात आले आहे किंवा काढण्यात येत आहे असे समुचित प्राधिकाऱ्यास आढळून येईल त्याबाबतीत त्या समुचित प्राधिकाऱ्यांस किंवा याबाबतीत त्याने यथोचित रीत्या प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास त्या जमिनीवर प्रवेश करता येईल, कोणताही अडथळा असल्यास तो दूर करता येईल, पंपाने पाणी खेचून बाहेर काढण्याचे बंद करता येईल, वीजपुरवठा तोडता येईल, अशा प्रकारे पाणी बाहेर काढण्याशी संबंधित असलेली कोणतीही सामग्री किंवा साधनसामग्री जप्त करता येईल व असे उल्लंघन थांबविण्याकरिता आवश्यक असेल अशी कोणतीही कारवाई करता येईल व त्या विहिरीच्या मालकाला किंवा जिच्या कब्जात ती विहीर असेल अशा व्यक्तीला अशी विहीर स्वखर्चाने व समुचित प्राधिकारी अशा आदेशात विनिर्दिष्ट करील अशा रीतीने बंद करण्यास किंवा सीलबंद करण्यास भाग पाडता येईल व असा मालक किंवा अशी व्यक्ती अशा आदेशाचे पालन करील.

(२) पोट-कलम (१) खाली काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे पालन करण्यात असा मालक किंवा व्यक्ती कसूर करील तर, समुचित प्राधिकाऱ्याला, अशा मालकास किंवा व्यक्तीस त्याबाबतीत योग्य ती नोटीस दिल्यानंतर त्या जमिनीवर प्रवेश करता येईल व ती विहीर बंद किंवा सीलबंद करता येईल व त्यासाठी आलेला खर्च अशा मालकाकडून किंवा व्यक्तीकडून जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल.

भरपाई देणे.

१२. कलम ९ अन्वये विहीर कायमची बंद करण्याचा किंवा सीलबंद करण्याचा आदेश देण्यात आला असेल त्याबाबतीत समुचित प्राधिकाऱ्यास, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यावर व असा पुरावा सादर करण्याची मालकाकडे मागणी केल्यावर, विहिरीच्या व त्यावरील बांध-कामांच्या बाजार मूल्यापेक्षा कमी होणार नाही एवढी भरपाई देण्याचा आदेश काढता येईल, आणि विहिरीच्या भरपाईची रक्कम निर्धारित करण्यासंबंधातील भूमि संपादन अधिनियम, १८९४ च्या तरतुदी, त्या अधिनियमान्वये संपादित करण्यात आलेल्या विहिरीसंबंधात जशा लागू होतात तशाच त्या या कलमान्वये विहिरीचे बाजारमूल्य निर्धारित करताना लागू होतील : १८९४ चा १.

परंतु, कलम ९ खालील आदेश विहीर तात्पुरती बंद करण्याशी किंवा सीलबंद करण्याशी संबंधित असेल त्याबाबतीत, असा आदेश देण्याच्या वेळेस ज्या उभ्या पिकांना तिचे पाणी देण्यात येत होते त्या पिकांबद्दलची भरपाई देखील या कलमान्वये देय असेल :

परंतु आणखी असे की, कलम ९ अन्वये देण्यात आलेल्या आदेशामुळे जी विहीर कायमची बंद करण्यात किंवा सीलबंद करण्यात आली असेल, ती विहीर, कोणत्याही कारणामुळे, तीमधून पाणी काढण्यासाठी उघडण्याची मुभा देण्यात आली असेल तर त्याबाबतीत त्यानंतर अशी विहीर कायमची बंद करण्याचा किंवा सीलबंद करण्याचा आदेश पुन्हा देण्यात आल्यास त्या विहिरीच्या मालकास अशा विहिरीबद्दल पुन्हा भरपाई मागण्याचा हक्क असणार नाही.

१३. कलम १२ च्या तरतुदींस अधीन राहून कोणत्याही व्यक्तीस कलम ३, पोट-कलम (५) च्या खंड (अ) अन्वये किंवा कलम ८ किंवा ११ अन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशा-मुळे किंवा या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही कारवाईमुळे झालेल्या तिच्या कोणत्याही नुकसानी बद्दल राज्य शासनाकडून कोणत्याही नुकसानभरपाईची किंवा भरपाईची मागणी करण्याचा हक्क असणार नाही. भरपाईचा दावा करण्यास मनाई.

## प्रकरण तीन

### संकीर्ण

१४. (१) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये समुचित प्राधिकाऱ्याने काढलेल्या कोणत्याही आदेशामुळे बाधा पोचलेल्या कोणत्याही व्यक्तीला, तिला आदेश मिळाल्याच्या दिनांका-पासून तीस दिवसांच्या आत, जिल्हाधिकाऱ्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही अधिकाऱ्याने तो आदेश काढलेला असेल तर जिल्हाधिकाऱ्याकडे व जिल्हाधिकाऱ्याने आदेश काढलेला असेल तर आयुक्ताकडे अपील करता येईल. असे अपील मिळाल्यानंतर अपील प्राधिकारी, अपीलकाराला सुनावणीची योग्य संधी दिल्यानंतर, आणि पुरावा सादर करण्याची परवानगी दिल्यानंतर त्याला योग्य वाटेल असा आदेश देईल. अपील प्राधिकाऱ्याने अशा अपिलात काढलेला प्रत्येक आदेश अंतिम असेल व त्याला कोणत्याही न्यायालयात हरकत घेता येणार नाही. अपिले.

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, "बाधा पोचलेली व्यक्ती" या शब्दप्रयोगात, स्थानिक प्राधिकरण, महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिस्सारण मंडळ, भूजल सर्वेक्षण व विकास अभिकरण आणि लोकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेले तर कोणतेही अभिकरण किंवा प्राधिकरण यांचा समावेश होतो.

(२) अशा अपिलावर कोणताही निर्णय देण्यापूर्वी अपील प्राधिकारी, वरिष्ठ भूशास्त्रज्ञाचे मत मिळवील व ते मत विचारातही घेईल.

(३) वरिष्ठ भूशास्त्रज्ञ, त्याबाबतीत त्याच्याकडे विचारणा करण्यात आल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत आपले मत अपील प्राधिकाऱ्याकडे पाठवील.

(४) पोट-कलम (१) मध्ये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत, या अधिनियमान्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश व प्रत्येक निदेश हा अंतिम असेल व कोणत्याही न्यायालयात त्याला हरकत घेता येणार नाही.

१५. (१) कोणत्याही लोक सेवकांविरुद्ध किंवा या अधिनियमान्वये नियुक्त केलेल्या किंवा प्राधिकृत केलेल्या व्यक्तींविरुद्ध या अधिनियमाखाली, किंवा या अधिनियमान्वये काढण्यात आलेला कोणताही आदेश किंवा कोणताही निदेश यांच्या अनुरोधाने, सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टींविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही. सद्भावनेने केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.

(२) या अधिनियमाखाली, किंवा या अधिनियमाखाली काढण्यात आलेला कोणताही आदेश किंवा निदेश यांच्या अनुरोधाने, सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे होणाऱ्या किंवा होण्याचा संभव असलेल्या कोणत्याही हानीबद्दल, राज्य शासन किंवा राज्य शासनाचा कोणताही अधिकारी यांच्याविरुद्ध कोणताही खटला किंवा इतर न्यायालयीन कार्यवाही दाखल करता येणार नाही.

१६. (१) जो कोणी या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील, किंवा कोणत्याही व्यक्तीस, ती या अधिनियमाखालील स्वतःची कर्तव्ये पार पाडत असता त्यात अडथळा आणील, किंवा या अधिनियमाखालील कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करील किंवा कोणत्याही नियमाचा भंग करील त्याला, अपराधसिद्धीनंतर, एक महिन्याहून कमी असणार नाही परंतु सहा महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांहून कमी असणार नाही, परंतु, पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील. शास्ती.

(२) जो कोणी, उचित प्राधिकार नसताना, सार्वजनिक पाणीपुरवठा यंत्रणेच्या कोणत्याही भागाला हानी पोचवील, त्यात फेरफार करील किंवा अडथळा आणील, त्याला, अपराधसिद्धीनंतर

दोन महिन्यांहून कमी असणार नाही परंतु एक वर्षापर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाची किंवा दोन हजार रुपयांहून कमी असणार नाही परंतु पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

(३) अपराध करणे चालू राहील त्याबाबतीत, अपराध्याला अपराधसिद्धीनंतर जेवढे दिवस अपराध करणे चालू राहील त्या प्रत्येक दिवसासाठी शंभर रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या जादा दंडाची शिक्षा देण्यात येईल.

नोटीस बजावणे. १७. (१) याबाबतीत कोणतेही नियम करण्यात आले असल्यास, त्यांस अधीन राहून, या अधिनियमान्वये काढण्यात आलेली प्रत्येक नोटीस किंवा आदेश, ज्या व्यक्तीवर बजावायचा असेल त्या व्यक्तीस किंवा तिच्या प्राधिकृत एजंटास, ती नोटीस किंवा तो आदेश याची प्रत देऊन किंवा सुपूर्द करून, किंवा डाकेने पाठवून किंवा, पूर्वोक्त रीतीने ती नोटीस किंवा तो आदेश बजावता येत नसेल त्याबाबतीत, त्या व्यक्तींच्या माहीत असलेल्या शेवटच्या राहत्या जागेच्या ठिकाणी किंवा जिच्यासंबंधात ती नोटीस किंवा तो आदेश असेल ती जमीन किंवा विहीर ज्या गावात असेल त्या गावातील सार्वजनिक राबत्याच्या जागी तिची/त्याची प्रत चिकटवून ती नोटीस किंवा आदेश बजावता येईल.

(२) अशा कोणत्याही नोटिशीमध्ये निर्देश केलेल्या, कोणत्याही व्यक्तीचे नाव किंवा पदनाम यातील अथवा कोणत्याही जमिनीच्या किंवा विहिरीच्या वर्णनातील कोणत्याही चुकीमुळे प्रत्यक्ष अन्याय झालेला नसेल तर अशा चुकीमुळे ती नोटीस निरर्थक ठरणार नाही.

अधिनियमाचा अधिभावी परिणाम. १८. या अधिनियमाच्या तरतुदी आणि त्याखाली केलेला किंवा काढलेला आदेश त्या त्या-वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात त्याविरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी परिणामक ठरेल.

नियम करण्याचा अधिकार. १९. (१) राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे आणि पूर्वप्रसिद्धीच्या शर्तींच्या अधीन राहून, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता नियम करता येतील. अशा नियमांमध्ये, या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनाकरिता फी आकारण्याची तरतूद करता येईल.

(२) ह्या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधान-मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबुल होतील व असा निर्णय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून यथास्थिति, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच तो नियम अंमलात येईल किंवा अंमलात येणार नाही; तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार २०. या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना काही अडचणी उद्‌भवल्यास राज्य शासनास, प्रसंगानुरूप, अडचणी दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी कोणतीही कृती आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, असा कोणताही आदेश, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर काढण्यात येणार नाही.

(यथार्थ अनुवाद)

प. म. पाटील,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

१९६२ चा स
महा. ५. त
१९९२ चा र
महा. वि
अध्या.
क्र. ७.
भाग आठ